# मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४(१) मधील १७ उपकलमे**

| अ.क्र. | उपकलम | तपशील |
|---|---|---|
| ०१. | रचना, कार्य व कर्तव्ये यांचा तपशील | महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार मराठवाडा विकास महामंडळ बंद करण्याच्या प्रक्रियेत आहे. शासनाच्या आदेशानुसार सामुहीक प्रोत्साहन योजना आणि बीज भांडवल योजने अंतर्गतच्या नस्त्या व दस्तऐवज मराठवाडयातील संबंधीत जिल्हा उद्योग केन्द्राकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत. मराठवाडा विकास महामंडळाच्या आस्थापनेवर एकही कर्मचारी कार्यरत नाही, त्यामुळे मराठवाडा विकास महामंडळास म्हणावे असे कार्य उरलेले नाही. तथापी महामंडळाचे व त्या अंतर्गत असलेल्या दुय्यम कंपन्यांचे लेखे अद्यावत करणे, शासनाच्या आदेशाप्रमाणे मालमत्तेची विक्री करणे, दायित्वे अदा करणे, महामंडळाच्या वार्षिक अहवालाचे विधान मंडळास सादरीकरण करणे, कंपनी कायद्या अंतर्गतच्या तरतुदीचे अनुपालन, सर्व सांविधिक कायद्याचे अनुपालन करणे, न्याय प्रविष्ठ प्रकरणांचा पाठपुरावा इत्यादी कामे महाराष्ट्र शासनाच्या आदेशाप्रमाणे मराठवाडा विकास महामंडळाच्या प्राधिकृत संचालक मंडळ व व्यवस्थापकिय संचालकांच्या मार्गदर्शनानुसार कंत्राटी सहाय्यका मार्फत केली जातात. |
| ०२. | अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये | मराठवाडा विकास महामंडळाच्या आस्थापनेवर एकही अधिकारी कर्मचारी कार्यरत नाही. अधिक्षकीय उद्योग अधिकारी, उपविभागीय कार्यालय, नांदेड व उद्योग सहसंचालक, औरंगाबाद विभाग यांच्याकडे मराठवाडा विकास महामंडळाच्या व्यवस्थापकिय संचालक पदाचा अतिरीक्त कार्यभार आहे. अधिकारी / कर्मचारी स्वेच्छानिवृत्त झाल्यामुळे त्यांच्या अधिकाराचा व कर्तव्याचा प्रश्न येत नाही. व्यवस्थापकिय संचालक यांचे अधिकार व कर्तव्ये उपरोक्त मुद्या क्रमांक ०१ प्रमाणे व शासनाच्या मार्गदर्शनानुसार आहेत. |
| ०३. | निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली | महाराष्ट्र शासन<br><br>उद्योग, उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र शासन - सचिव (लघु व मध्यम उद्योग)<br><br>संचालक मंडळ<br><br>व्यवस्थापकिय संचालक<br><br>अधिकारी व कर्मचारी (नाही) |
| ०४. | कार्ये पार पाडण्यासाठी ठरविण्यांत आलेली मानके. | मराठवाडा विकास महामंडळाकडे कोणत्याही प्रकारचे कार्य अस्तित्वात राहीलेले नाही तथापी कंपनी कायद्या अंतर्गतच्या तरतुदी व महामंडळाचे मेमोरंडम आणि आर्टिकल्स ऑफ असोसिएशन नुसार तत्व (मानके) प्रणाली लागु आहे. |
| ०५. | महामंडळाकडे असलेली किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेली किंवा त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी त्यांच्या कर्मचारी वर्गाकडुन वापरण्यांत येणारे नियम, विनीयम, सुचना, नियम पुस्तिका आणि अभिलेख | शासनाचे आदेश, महामंडळाची घटना, नियमावली व सेवा नियमावली याचे पालन करणे. |
| ०६. | महामंडळाकडे असलेल्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण. | प्रवर्ग — प्रशासकिय विभाग, लेखा विभाग, व सचिवीय विभाग. |
| ०७. | महामंडळाचे धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, लोकांशी विचार विनीमय करण्यासाठी किंवा लोकांकडुन निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील. | माहिती अधिकारी म्हणुन महामंडळाचे संचालक हे जनसंपर्क पाहतात. महामंडळाकडे इतर कोणताही कर्मचारी वर्ग नाही. |

| | | |
|---|---|---|
| ०८. | महामंडळाचा एक भाग म्हणुन किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणुन गठीत केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळुन बसलेल्या मंडळाचे, परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकायचे विवरण, आणि त्या मंडळाच्या, परिषदांच्या, समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण. | मराठवाडा विकास महामंडळाकडे संचालक मंडळ असुन इतर कोणतेही सल्लागार मंडळे, परिषदा, समित्या, इतर बॉडीज नाहीत. संचालक मंडळाच्या बैठकीत महामंडळाचे संचालक उपस्थित राहतात व या बैठकीचे कार्यवृत्त जनतेस मागणीप्रमाणे उपलब्ध करुन दिले जाते. |
| ०९ | महामंडळातील अधिका-यांची आणि कर्मचा-यांची निर्देशिका | महामंडळाच्या आस्थापनेवर कोणतेही अधिकारी व कर्मचारी नसल्यामुळे त्यांच्या निर्देशिका बाबतचा प्रश्न येत नाही. तथापी महामंडळाच्या व्यवस्थापकिय संचालक पदाचा जो पदभार अधिक्षकीय उद्योग अधिकारी, उपविभागीय कार्यालय, नांदेड यांच्याकडे आहे त्यांची निर्देशिका शासनाच्या उद्योग संचालनालयास वेळोवेळी सादर करण्यात येते |
| १० | महामंडळातील प्रत्येक अधिका-याला व कर्मचा-याला मिळाणारे मासिक वेतन, तसेच प्राधिकरणाच्या विनीमयांमध्ये तरतुद केल्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याची पध्दत. | महामंडळाच्या आस्थापनेवर कोणतेही अधिकारी व कर्मचारी कार्यरत नसल्यामुळे मासिक वेतन अदा करण्याचा प्रश्न येत नाही. तथापी महामंडळाची कामे हाताळण्यासाठी जे कंत्राटी सहाय्यक कार्यरत आहेत त्यांना महामंडळाकडुन एकत्रित मानधन अदा केले जाते, व अधिक्षकीय उद्योग अधिकारी, उपविभागीय कार्यालय, नांदेड यांची महामंडळाच्या व्यवस्थापकिय संचालक पदी शासनाकडुन नियुक्ती करण्यात आल्यामुळे त्यांचे वेतन शासनाकडुन अदा केले जाते, व त्यांना महामंडळाकडुन वेतन स्वरुपात वेतन उपलब्धी नाही. त्यामुळे विनीमयामध्ये तरतुद केल्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याची पध्दत याबाबत प्रश्न येत नाही. |
| ११ | सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमुन दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरीत केलेल्या रकमांचा अहवाल. | मराठवाडा विकास महामंडळाकडे कोणत्याही योजना अस्तित्वात नाहीत व प्रस्तावित नाहीत त्यामुळे योजने निहाय आर्थिक तरतुद केली जात नाही. |
| १२ | अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभाधिका-यांचा तपशील. | महामंडळातर्फे अर्थसहाय्य कार्यक्रम राबविला जात नाही त्यामुळे माहिती निरंक |
| १३ | ज्या व्यक्तीना सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तीचा तपशील. | महामंडळाने परवाने किंवा प्राधिकारपत्रे प्रदान केलेली नाहीत त्यामुळे माहिती निरंक |
| १४ | इलेक्ट्रानिक स्वरुपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील. | महामंडळाकडील माहिती संगणकात एकत्रीत केली जाते. |
| १५ | माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणा-या सुविधांचा तपशील, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रथांलयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील. | महामंडळाकडे पुर्वीचेच ग्रंथालय असुन यामध्ये उद्योग व्यवसाया संबंधातील ग्रंथ आहेत. त्यात नविन ग्रंथ संपदा नाही. |
| १६ | जनमाहिती अधिका-यांची नांवे, पदनाम आणि इतर तपशील. | **जन माहिती अधिकारी** श्री. पु.दे. भाले, संचालक मराठवाडा विकास महामंडळ, मर्यादित<br><br>**अपिलीय अधिकारी:** श्री. प्र. प. देशमुख, व्यवस्थापकिय संचालक, मराठवाडा विकास महामंडळ, मर्यादित |
| १७ | विहीत करण्यांत येईल अशी इतर माहिती. | निरंक |

व्यवस्थापकिय संचालक